# ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा संदेश

कोल्हापूर टाइम्स टीम

आयुष्यातील ग्रंथाचे स्थान गुरूसम आहे या उक्तीनुसार ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा संदेश देत शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त सोहळ्याला शुक्रवारी सकाळी आठ वाजता प्रारंभ झाला. वाचनातून विचार प्रगल्भ करा, अशा शब्दांत प्रबोधन करत या ग्रंथदिंडीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी ग्रंथजागर केला. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहून या ग्रंथदिंडीला सुरुवात करण्यात आली. कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठ या मार्गावर दिंडीसोबत विविध पथनाट्यातून विचारांची पेरणी करण्यात आली.

सकाळी साडेआठ वाजता कमला कॉलेज येथून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते पालखीत ठेवण्यात आलेल्या ग्रंथांचे पूजन करून दिंडीला प्रारंभ झाला. पालखीची सजावट आकर्षक फुलांनी करण्यात आली होती. राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौक, दूरशिक्षण केंद्र या मार्गे दिंडी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आली.



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, नमिता खोत, डॉ. डी. टी. शिर्के आदी.

ग्रंथदिंडी मिरवणुकीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधणारे फलक, देखावे सादर केले. कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी ग्रंथदिंडीनिमित्त 'स्त्री भ्रूण हत्या रोखूया' हा संदेश देणारे पथनाट्य सादर केले. शहाजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'क्षयरोग...एक भयानक वास्तव' या विषयावर प्रबोधन फलकाच्या माध्यमातून लक्ष वेधले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, ग्रंथपाल नमिता खोत, ए. ए. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत आदी मान्यवर तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आदी उपस्थित होते.